# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

शैक्षणिक पात्रता विभाग
गणेशखिंड, पुणे—०७

दूरध्वनी क्रमांक:—
०२०—२५६०१२६६
२५६०१२७२
Email :dyrelg@unipune.ac.in

दिनांक :२०/०९/२०१७

संदर्भ क्र.—शै.पा./२४३

प्रती,
मा. प्राचार्य/मा. संचालक/मा.विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये/सर्व मान्यता प्राप्त संस्था/
सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय:— शैक्षणिक पात्रता २०१७ — १८...**

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ या वर्षातील ऑनलाईन पध्दतीने शैक्षणिक पात्रता करताना खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१) शैक्षणिक पात्रता परिपत्रक क्र. १००/२०१७ विद्यापीठाच्या www.unipune.ac.in- Circulars - Eligibility Circulars - Circular No.100 of 2017 यासंकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

२) शैक्षणिक पात्रता ऑनलाईन करताना एक्सेलशीट अपलोड करण्यासाठी खालील दिनांकानुसार करण्यात याव्यात. विलंब शुल्क विरहीत दि. ३० सप्टेंबर, विलंबशुल्कासह दि. ३१ ऑक्टोंबर आणि विलंब शुल्क (रु.५०) + विशेष विलंब शुल्क (रु.२००) दिनांक ३० नोव्हेंबर असेल. त्यानंतर येणाऱ्या याद्यांना विशेष शुल्क (रु.२५०) + प्रतिविद्याथी रु. १०००/— दंड इतकी रक्कम विद्यापीठात जमा करावी लागेल. धनाकर्ष स्विकारण्याची पध्दत बंद करण्यात आलेली आहे. शैक्षणिक पात्रता शुल्क RTGS/NEFT द्वारे भरुन सदर चलनाची एक प्रत शैक्षणिक पात्रता याद्या सादर करताना विद्यापीठकडे सादर करावयाची आहे.

३) शैक्षणिक पात्रता ऑनलाईन करताना विद्यार्थ्यांचे नाव अचूक भरणे आवश्यक आहे. कारण शैक्षणिक पात्रता ऑनलाईन झाल्यानंतर विद्यार्थ्यास पात्रता क्रमांक दिला जातो. व सदर क्रमांक परिक्षा अर्ज भरतांना लिहावा लागतो.

विद्यार्थ्याच्या १२ वी च्या गुणपत्रकाप्रमाणे नाव असणे आवश्यक आहे. एक्सेल शीट भरताना विद्यार्थ्याच्या नावात काही त्रुटी आढळल्यास मा. प्राचार्यांनी कागदपत्रांची खातरजमा करून शैक्षणिक पात्रता विभागाचे परिपत्रक क्र. शैपा/९०, दि. ३१/०५/२०१७ रोजी दिलेल्या नमून्यातच नावातील दुरुस्तीबाबत पत्र विद्यापीठास सादर करावे त्यासोबत कागद पत्र जोडण्याची आवश्यकता नाही.

४) आपल्या महाविद्यालयास विद्यापीठाने मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येची खातरजमा करण्यासाठी मंजूर प्रवेश क्षमतेचे पत्र जोडणे आवश्यक आहे. शैक्षणिक विभागाचे परिपत्रक क्र. ३६/२०१७ नुसार सदर मंजूर प्रवेश क्षमतेच्या मागील ३ वर्षाच्या संलग्नीकरणाच्या मान्यतेची पत्र पात्रता याद्यां सोबत जाडणे आवश्यक आहे. सदर पत्रांशिवाय पात्रता याद्या स्वीकारल्या जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

प्रवेश क्षमतेत बदल असल्यास त्याप्रमाणे पत्र दाखवून प्रवेश क्षमता दाखविताना प्रथम वर्षाची प्रवेश क्षमताच फक्त विचारात घेण्यात यावी. ऑनलाईन भरलेली प्रवेश क्षमता बरोबर आहे हे तपासून घेणे आवश्यक आहे व त्याबाबतचा पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

५) महाविद्यालयाने शैक्षणिक पात्रता शुल्क (६०%) RTGS / NEFT द्वारे विद्यापीठाकडे जमा करावयाचे आहे व उरलेले शैक्षणिक पात्रता शुल्क (४०%) महाविद्यालयाकडे ठेवून घेणे. तसेच सर्टीफिकेट कोर्सेस, पदविका, पदवी, पदव्युत्तर, एम.फील., पी.एच.डी आणि इतर सर्व अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांसाठी पात्रता शुल्क आकारण्यात यावे.

६) ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश केलेले नाहीत, त्यांनी प्रवेश झाले नसल्याचे विद्यापीठास लेखी कळवावे.

७) विहित मुदतीनंतर सादर केलेल्या शैक्षणिक पात्रता याद्या स्विकारल्या जाणार नाहीत.

८) इतर विद्यापीठातून सर्व विषयांत उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यास आपल्या विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयात प्रवेश देतांना पात्रता विभागाने Equivalence Circular to all Colleges या शिर्षकाखालील परिपत्रक क्र. शै.पा./११८ दि.२८/०४/२०१६ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार समकक्षतेची प्रक्रिया पूर्ण करावी. द्वितीय वर्षास इतर विद्यापीठांतून प्रथम वर्ष कला वाणिज्य व विज्ञान पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची समकक्षता प्रकरणे पात्रता विभागाकडे पाठवू नयेत, त्याची प्रकरणे महाविद्यालयातच निकाली काढावीत.

९) इतर विद्यापीठांतून प्रथम आणि द्वितीय वर्षात सर्व विषय उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यास आपल्या विद्यापीठात प्रवेश देतांना सदर विद्यापीठांचे नाव शैक्षणिक पात्रता विभागाच्या परिपत्रक मध्ये नमूद केलेल्या विद्यापीठांच्या यादीत आहे का ? याची खात्री करावी. तसेच अशा विद्यार्थ्यांना फक्त उत्तीर्ण श्रेणी (Pass Class) दिली जाईल, याची स्पष्ट कल्पना विद्यार्थ्यांना द्यावी. अशा विद्यार्थ्यांची समकक्षता प्रकरणे सदर विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकांच्या झेरॉक्स प्रती, पूर्वीच्या विद्यापीठाचा Syllabus आणि बॅंक ऑफ महाराष्ट्र, विद्यापीठ शाखा येथे भरलेल्या रु.५००/— च्या चलनाची प्रत जोडून महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी स्वत: पात्रता विभागात विद्यार्थ्याला प्रवेश दिल्यापासून ३० दिवसाच्या आत जमा करावीत.

१०) प्रत्येक समकक्षतेच्या अर्जासोबत प्रती विद्यार्थी रु.५००/— चे चलन जोडून पाठविणे आवश्यक आहे. सदरचे चलन challan for equivalence proposal या शिर्षकाखाली शैक्षणिक पात्रता परिपत्रकात उपलब्ध आहे. सदर प्रति विद्यार्थी रु. ५००/— चे चलन बॅंक ऑफ महाराष्ट्र, विद्यापीठ शाखा येथे जमा करावयाचे आहे.

११) विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार १० वी नंतर महाराष्ट्र शासनाचा व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचा (ITI) २ वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना बी.ए. आणि बी.कॉम. या अभ्यासक्रमास प्रवेश देण्याबाबत मा.प्राचार्यांनी निर्णय घ्यावा तसेच अशी प्रकरणे विद्यापीठाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

१२) एका विद्याशाखेतून विद्यार्थी दुसऱ्या विद्याशाखेत प्रवेश घेत असेल म्हणजे कोर्स बदलत असेल तर अशा विद्यार्थ्याची शैक्षणिक पात्रता पुन्हा करावी लागेल. विद्यार्थी एका महाविद्यालयातून आपल्याच विद्यापीठांतर्गत असलेल्या दुसऱ्या महाविद्यालयात त्याच अभ्यासक्रमासप्रवेश घेत असेल तर अशा विद्यार्थ्याची शैक्षणिक पात्रता करावी लागत नाही,तर पहिल्या महाविद्यालयातून ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) स्थानांतर प्रमाणपत्र (T.C.) व शैक्षणिक पात्रता नंबर प्रवेश घेत असलेल्या महाविद्यालयास द्यावा.

१३) विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी विद्यार्थ्याचे एकत्रित रक्कम बॅकेत भरून एकच चलन काढावे.

१४) सत्र पूर्तता संपली असेल व विद्यार्थी नव्याने प्रवेश घेत असेल तर अशा विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता पुन:श्च करावी लागते.

१५) ज्या विद्यार्थ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी यांचा कृषी तंत्र निकेतन हा तीन वर्ष कालावधीचा सेमी इंग्रजी माध्यमाचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असेल त्यांना प्रथम वर्ष विज्ञान (F.Y.B.Sc.) साठी प्रवेश घेता येईल. अशा विद्यार्थ्यांची समकक्षता संबंधित महाविद्यालयाच्या विज्ञान विद्याशाखेच्या समकक्षता समितीने करून नंतर प्रवेश निश्चित करावा.

१६) वाणिज्य विद्याशाखे अंतर्गतचा MCA हा अभ्यासक्रम २०१६–१७ वर्षापासून बंद करण्यात आलेला आहे.

१७) व्यवस्थापन विद्याशाखे अंतर्गत येणारे सर्व अभ्यासक्रमांना तसेच विज्ञान विद्याशाखे अंतर्गत चालणाऱ्या MCA या अभ्यासक्रमाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेची (AICTE) मान्यता असल्याशिवाय या अभ्यासक्रमांना प्रवेश देऊ नये असे कळविण्यात आले आहे, AICTE ची मान्यता असल्याशिवाय जर प्रवेश दिले असतील तर त्यांची ऑनलाईन पात्रता करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१८) मंजूर क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास विद्यापीठ परिनियम १७९(४)(सी) अन्वये संबंधित अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्काच्या पाचपट दंड आकारण्यात येईल व याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय कारवाई ही होऊ शकते.

१९) शै. वर्ष २०१७–१८ पासून B.Sc.(Hospitality Studies) हा अभ्यासक्रम विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखे अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेला आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत या अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येऊ नये.

२०) B.Sc. Nanoscience and Nano Technology हा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना M.Sc. Physics, Chemistry, Botony, Zoology, Microbiology, Biochemistry, Biotechnology and Environmental Science या अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावा.

२१) विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पात्रतेचा फॉर्म भरताना प्रत्येक विद्यार्थ्यांचा आधार कार्ड क्रमांक त्यात सामाविष्ट करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांकडून त्यांचा अचूक आधार

कार्ड क्रमांक, मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी टाकण्यात यावा व त्यासंबंधीच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

२२) महाविद्यालयांना प्रवेश देतांना विद्यार्थ्यांच्या आरक्षणाविषयी, जात प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र पडताळणी विषयी काही शंका असल्यास विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाशी संपर्क साधावा.

२३) शैक्षणिक पात्रता विभागाच्या दि.१३/०९/२०१७ रोजीच्या परिपत्रक क्रमांक शै.पा./२३६ नुसार, **अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या** शैक्षणिक पात्रता याद्या विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नसून सदर याद्या संबंधित महाविद्यालयांनी पुढील तीन वर्षापर्यंत जतन कराव्यात.

२४) शैक्षणिक पात्रता विभागाच्या दि.१३/०९/२०१७ रोजीच्या परिपत्रक क्रमांक शै.पा./२३५ नुसार, एमसीव्हीसी अभ्यासक्रमा ऐवजी **एच.एच.सी. व्होकेशनल** असा बदल ग्राह्य धरण्यात यावा. तसेच प्रथम वर्ष विज्ञान अभ्यासक्रमास अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अभ्यासक्रमांचे बदललेले संकेतांक विचारात घ्यावेत.

२५) **स्थलांतर प्रमाण पत्राबाबत (Migration Certificate)**

विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी विद्यापीठ सोडून दुसऱ्या विद्यापीठात प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांना स्थलांतर प्रमाणपत्राची आवश्यकता असते. सदर प्रमाणपत्र विद्यापीठाकडून देण्यात येते. त्याबाबत विद्यार्थ्यांना Online Application विद्यापीठाचे संकेतस्थळ (unipune.ac.in) वर करावयाचे असते. स्थलांतर प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्याने स्थानांतर प्रमाणपत्र (T.C.) मूळप्रत व अलिकडे दिलेल्या परीक्षेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे, परंतु विद्यार्थ्याचे स्थानांतर प्रमाणपत्र मूळप्रत अन्य ठिकाणी प्रवेशासाठी दिले असल्यास त्यास महाविद्यालयाने अधिकची एक स्थानांतर प्रमाणपत्राची प्रत द्यावी व सदर प्रमाणपत्रावर (T.C. For Migration Purpose) असा उल्लेख असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने महाविद्यालयात परीक्षेस बसला नसेल किंवा प्रवेश रद्द केला असेल तर T.C. मध्ये Exam Not Appeared असा उल्लेख असावा.

२६) ऑनलाईन पात्रतेसंदर्भातील कार्यपध्दती अवलंबण्याबाबत काही सूचना /मार्गदर्शना साठी पुढील E-mail ID : bcudsupport@pun.unipune.ac.in किंवा 020 2560 1388 /1387/1372 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

२७) **बहि:स्थ विभाग**

१) प्रथम वर्ष बहि:स्थ विभागामार्फत केले असल्यास अशा विद्यार्थ्याला द्वितीय वर्षात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येईल. तसेच प्रथमवर्ष नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असल्यास अशा विद्यार्थ्याला द्वितीय वर्षास बहि:स्थ विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येईल परंतु अशा विद्यार्थ्यांनी संपूर्ण विषय उत्तीर्ण झालेले असावते. A.T.K.T. अन्वये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना असा प्रवेश घेता येणार नाही. विद्यापीठाच्या बहि:स्थ विभागामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांना देण्यात येणारा UID No./Eligibility No. हाच त्यांचा पात्रता क्रमांक असून महाविद्यालयांनी तोच क्रमांक विद्यार्थ्यांना नियमित प्रवेश देतांना त्यांच्याकडून घ्यावा.

२) द्वितीय वर्षासाठी बहि:स्थ विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असल्यास त्याला तृतीय वर्षात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येणार नाही. त्याचप्रमाणे द्वितीय वर्षासाठी नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असल्यास त्याला तृतीय वर्षास बहि:स्थ विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येणार नाही.

वरील सर्व सुचनांचे पालन करून विद्यापीठास नेहमीप्रमाणे सहकार्य करावे, तसेच वरील सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात ही विनंती.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
शैक्षणिक पात्रता विभाग